# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 04 June 2025

## Time 18.10 to 18.20

## Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – ०४ जून २०२५ सायंकाळी ६.१०**

****

- संसदेचं पावसाळी अधिवेशन येत्या २१ जुलैपासून सुरु होणार
- जागतिक पर्यावरण दिनानिमित्त उद्या विविध कार्यक्रमांचं आयोजन
- जनतेला स्वच्छ आणि परवडण्याजोगी ऊर्जा मिळावी यासाठी सरकार आग्रही – पंतप्रधानांचं प्रतिपादन
- केंद्र सरकारच्या मेक इन इंडिया योजनेचा राज्याला मोठा लाभ – बँक ऑफ अमेरिका फ्लॅगशिप इंडिया परिषदेत मुख्यमंत्र्यांची माहिती

आणि

- स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातर्फे १३ दिवसात पदवी परीक्षांचे निकाल जाहीर

****

आता सविस्तर बातम्या

****

संसदेचं पावसाळी अधिवेशन येत्या २१ जुलैपासून सुरु होणार आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या संसदीय कामकाज समितीची बैठक संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांच्या अध्यक्षतेखाली आज नवी दिल्लीत झाली, त्यानंतर संसदीय कामकाजमंत्री किरेन रिजिजू यांनी वार्ताहरांना ही माहिती दिली. हे अधिवेशन येत्या १२ ऑगस्टपर्यंत चालेल. त्यात सर्व विषयांवर चर्चा शक्य आहे असं ते म्हणाले. ऑपरेशन सिंदूरच्या पार्श्वभूमीवर संसदेचं विशेष अधिवेशन घेण्याची मागणी काही काळ विरोधी पक्षांकडून होत होती. मात्र आता नियमित पावसाळी अधिवेशनाच्या

तारखा जाहीर झाल्या असल्यानं विशेष अधिवेशन होण्याची शक्यता कमी असल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

जागतिक पर्यावरण दिन उद्या साजरा होणार आहे. यानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत नवी दिल्लीतल्या भगवान महावीर वनस्थली उद्यानात विशेष वृक्षारोपण मोहिमेचा शुभारंभ करण्यात येणार आहे. एक पेड मां के नाम या मोहिमेअंतर्गत ते यावेळी वडाचं झाड लावणार आहेत. नवी दिल्लीत उद्या २०० इलेक्ट्रीक शहर बसेसचा शुभारंभ देखील पंतप्रधानांच्या हस्ते करण्यात येणार आहे. दिल्ली प्रशासनाच्या या इलेक्ट्रीक बसेस प्रवाशांना माफक दरात पर्यावरण पूरक प्रवासाचा लाभ देतील.

पर्यावरण दिनानिमित्त राज्यात विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. उद्या सकाळी मंत्रालयातले अधिकारी आणि कर्मचारी हे त्यांच्या वापरातील एकल प्लास्टिक टाकून देणार असून, प्लास्टिक वापरणार नाही अशी शपथ घेणार आहेत. पर्यावरण आणि वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम होणार असून, यावेळी कापडी पिशव्यांचं वाटप करण्यात येणार आहे.

****

मागच्या अकरा वर्षात देशातल्या ऊर्जा क्षेत्रात संरचनात्मक परिवर्तन झालं असून, जनतेला स्वच्छ आणि परवडण्याजोगी ऊर्जा मिळावी यासाठी सरकार आग्रही असल्याचं प्रतिपादन, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं. सुधारणा, हरित ऊर्जा उपक्रम आणि स्वावलंबन यासाठी सरकारचा विशेष आग्रह असल्याचं त्यांनी समाजमाध्यमावरच्या पोस्टद्वारे सांगितलं. यासाठी त्यांनी पेट्रोलियम मंत्री हरदीप सिंग पुरी यांच्या एका लेखाचा दाखला दिला. भारत जगातली सर्वात वेगानं वाढणारी अर्थव्यवस्था आहे, तसंच एक धोरणात्मक शक्ती म्हणूनही उदयाला येत आहे, असं पुरी यांच्या या लेखात म्हटलं आहे. ऊर्जा क्षेत्र देशाच्या विकासासाठी महत्त्वाचं असून, गेल्या दहा वर्षात केलेल्या कामामुळे या क्षेत्रात संरचनात्मक परिवर्तन झाल्याचंही पुरी यांनी नमूद केलं.

****

केंद्र सरकारच्या मेक इन इंडिया योजनेचा राज्याला मोठा लाभ झाल्याचं प्रतिपादन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं. ते आज मुंबईत बँक ऑफ अमेरिका फ्लॅगशिप इंडिया परिषदेत बोलत होते. महाराष्ट्राची वाटचाल संरक्षण उत्पादन निर्मिती हब

आणि स्टार्ट अप हबच्या दिशेनं सुरु असल्याचं ते म्हणाले. राज्याच्या प्रशासनात डिजिटल तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणात वापर करुन सुलभता आणण्याचा प्रयत्न करण्यात येत असल्याचं त्यांनी सांगितलं. महानगरांवरचा वाढता भार कमी करण्यासाठी द्वितीय आणि तृतीय श्रेणींची शहरं विकसित करण्यात येत आहेत. याच प्रयत्नांचा भाग म्हणून औद्योगिकरणाचं विकेंद्रीकरण करुन छत्रपती संभाजीनगर, नांदेड, गडचिरोली ही शहरं विकसित करण्यात येत असल्याचं मुख्यमंत्री म्हणाले.

****

दरम्यान, मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत आज राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची बैठक घेण्यात आली. आपत्तीमध्ये सामान्य नागरिकांचं जीवन सुसह्य व्हावं, त्यांना आपत्तीची झळ बसू नये यासाठी आपत्ती व्यवस्थापनाने दर्जेदार काम करावं, असे निर्देश त्यांनी यावेळी दिले. उपमुख्यमंत्री अजित पवार, आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन आदी यावेळी उपस्थित होते. आपत्ती व्यवस्थापनाचा निधी सौम्यीकरण कामासाठी खर्च व्हावा, पावसानंतर नुकसान झालेले रस्ते, बंधारे, वीज वाहिन्या दुरुस्ती कामासाठीसुद्धा या निधीचा उपयोग करावा, अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिल्या.

****

दहशतवादाविरुद्ध भारताच्या शून्य सहिष्णुतेचं धोरण स्पष्ट करण्यासाठी जगभरातल्या विविध देशांना भेट देण्यासाठी गेलेल्या सात बहुपक्षीय शिष्टमंडळांपैकी चार शिष्टमंडळं भारतात परतली आहेत. या दौऱ्यात शिष्टमंडळांनी विविध परदेशी नेते, वरिष्ठ अधिकारी, प्रभावशाली विचारवंत, माध्यमं आणि भारतीय समुदायांशी संवाद साधला. शिवसेना खासदार श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखालचं शिष्टमंडळ आज सकाळी यूएई, लायबेरिया, काँगो आणि सिएरा लिओनला भेट देऊन भारतात परतलं. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वाखालचं शिष्टमंडळ देखील कतार, दक्षिण आफ्रिका, इथिओपिया आणि इजिप्तला भेट देऊन मायदेशी परतलं.

****

सौदी अरबमधल्या मक्का इथं आज पाच दिवसीय वार्षिक हज यात्रेचा विधिवत शुभारंभ करण्यात आला. भारतासह जगभरातून लाखो मुस्लिम भाविक या यात्रेत सहभागी होण्यासाठी मक्का हून मीना इथं एकत्र येत आहेत. परवा शुक्रवारी

कुर्बानीच्या विधीसह शैतानाला दगड मारणं आणि मक्का इथे खाना ए काबा हा विधी हे भाविक करतील. येत्या रविवारी हज यात्रेचा समारोप होणार आहे.

****

बंगळुरु चेंगराचेंगरी

****

नैसर्गिक आपत्तीमुळे पडझड, नुकसान झालेल्या घरांच्या दुरुस्ती, पुनर्बांधणी यासाठी आपत्तीग्रस्तांना तातडीने आर्थिक मदत करण्यासाठी सर्व विभागीय आयुक्तांना ४९ कोटी रुपये इतका निधी वितरीत करण्यास मान्यता देण्यात आली आहे. मदत आणि पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी आज ही माहिती दिली. या संदर्भातील शासन निर्णय आज जारी करण्यात आला. या निर्णयानुसार राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानकानुसार अंतर्गत सद्यःस्थितीत छत्रपती संभाजीनगर आणि पुणे विभागाला प्रत्येकी १२ कोटी रुपये, नागपूर विभागाला १० कोटी, तर नाशिक आणि अमरावती विभागाला प्रत्येकी पाच कोटी रुपये इतका निधी निधी वितरीत करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

****

राज्यात मध्य रेल्वे अंतर्गत येणाऱ्या मिरज कॉर्ड लाईन योजनेला रेल्वे मंत्रालयानं मंजुरी दिली आहे. १२९ कोटी रुपयांच्या या प्रकल्पाचा उद्देश रेल्वे वाहतुकीत सुधारणा करणं आणि मिरज जंक्शन वरची गर्दी कमी करणं, हा आहे. या योजनेमुळे पश्चिम महाराष्ट्रातल्या रेल्वेच्या पायाभूत सुविधा अधिक मजबूत होतील, असं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातर्फे १३ दिवसात पदवी परीक्षेचं निकाल जाहीर करण्यात आले. विद्यापीठातर्फे यावर्षी पेपरच्या मूल्यांकनासाठी प्रथमच अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला. यामध्ये जवळपास साडे आठ लाख उत्तरपत्रिकांचं स्क्रीनिंग करून त्या चार जिल्ह्यातल्या ७६ मुल्यांकन केंद्रावर ऑनलाईन पाठवण्यात आल्या होत्या. यामुळे प्राध्यापकांना तात्काळ मूल्यांकन करता आलं. पदवी आणि पदव्युत्तरच्या एकूण १८३ अभ्यासक्रमाची परीक्षा विद्यापीठातर्फे घेण्यात आली होती.

****

नाशिक इथले शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उपनेते सुधाकर बडगुजर यांची पक्षातून हकालपट्टी करण्यात आली आहे. जिल्हाप्रमुख डी जी सूर्यवंशी यांनी आज पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. गेल्या अनेक दिवसांपासून बडहुजर यांच्या पक्षांतराबाबत चर्चा सुरू होत्या. पक्षात संघटनात्मक बदल करताना आपल्याला विश्वासात घेतलं नसल्यानं नाराज असल्याचं बडगुजर यांनी जाहीर केलं होतं.

****

महाराष्ट्र साहित्य परिषदेची सोलापूर शाखा, आणि प्रिसिजन फाऊंडेशन यांच्यावतीने दिला जाणारा ज्येष्ठ कवी स्वर्गीय दत्ता हलसगीकर श्रेष्ठ साहित्यिक राज्यस्तरीय पुरस्कार नामवंत कवी वैभव जोशी यांना जाहीर करण्यात आला आहे. दहा हजार रुपये रोख, चांदीचं कमळ, आणि मानपत्र असं या पुरस्काराचं स्वरूप आहे. सोलापूर इथं येत्या रविवारी हा पुरस्कार प्रदान करण्यात येईल अशी माहिती परिषदेचे अध्यक्ष पद्माकर कुलकर्णी यांनी दिली.

****

येत्या एक ते सात जुलै दरम्यान देशात साजरा करण्यात येणाऱ्या वन महोत्सव सप्ताहानिमित्त महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्रविकास प्राधिकरण म्हाडा तर्फे राज्यात सुमारे दोन लाख झाडांचं रोपण करण्यात येणार आहे. यापैकी सुमारे ५० हजार झाडं मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रात लावण्यात येणार असल्याची माहिती म्हाडाचे उपाध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल यांनी दिली. म्हाडा मुख्यालयात आयोजित विभाग प्रमुखांच्या बैठकीत ते आज बोलत होते. राज्यात छत्रपती संभाजीनगर सह पुणे, नाशिक, नागपूर आणि अमरावती या म्हाडाच्या विभागीय मंडळांच्या कार्यक्षेत्रातून प्रत्येकी मंडळाने २५ हजार झाडांचं रोपण करण्याचं आवाहन त्यांनी केलं.

****

वसुंधरेच्या संवर्धनासाठी ग्राहकांनी गो ग्रीन सेवेचा पर्याय निवडावा, असं आवाहन महावितरणने केलं आहे. दरमहा छापील कागदी बिलाऐवजी ई–मेलद्वारे वीजबिल स्वीकारण्याच्या गो ग्रीन सेवेचा पर्याय निवडल्यानंतर ग्राहकांना तत्काळ वीजबिलात एकरकमी १२० रुपये सूट महावितरणकडून दिली जात आहे.

****